# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या हस्ते पशु-पक्षी उपचार केंद्राचे लोकार्पण**
- **आजपासून राबविण्यात येणार रेबिजमुक्त मिरा भाईंदर अभियान**

दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते अय्यप्पा मंदिर मिरा रोड येथील पशु-पक्षी उपचार केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. तसेच मिशन रेबीजमुक्त मिरा भाईंदर शहर अभियान मोहिमेची सुरुवात करण्यात आली. सदर प्रसंगी अति.आयुक्त डॉ.संभाजी पानपट्टे, उपायुक्त रवि पवार, शहर अभियंता दिपक खांबित, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम निराटले, पशु वैद्यकीय डॉ. शितल भोये व कर्मचारी उपस्थित होते.

सदर पशु-पक्षी उपचार केंद्रात रस्त्यांवरील मोकाट कुत्रे आणि मांजर यांचे उपचार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मांजरांची नसबंदी देखील या पशुपक्षी उपचार केंद्रावर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर WVS या संस्थेच्या सहयोगाने मिरा भाईंदर शहरात मिशन रेबीज मोहीम अंतर्गत आजपासून लसीकरण सुरू करण्यात येणार आहे. पुढच्या सात दिवसात १५ हजार ते २० हजार मोकाट कुत्र्यांचे लसीकरण करण्याचे मिरा भाईंदर महानगरपालिकेने उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी लसीकरण करण्याकरिता डॉक्टरांची १० पथके व ४० सहकारी इतके मनुष्यबळ वापरण्यात येणार आहे. मोहिमेची सुरुवात अति. आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे यांच्या हस्ते एका श्वानाचे लसीकरण करून करण्यात आली. याप्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरातील सर्व मोकाट तसेच पाळीव कुत्र्यांना लसीकरण करून रेबीज मुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. शहरातील श्वान प्रेमींनी याप्रसंगी उपस्थित राहून समाधान व्यक्त केले.